# महिला आरक्षण बिल १२ ऑगष्ट २००५

संसदे (लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद) मध्ये महिलाना स्थान असावे, त्यांची संख्या लक्षणीय असावी असा विचार चालू आहे. त्या करता आरक्षण हा उपाय व तो कसा अमलात आणावा या बद्दल गहन चर्चा गेली कित्येक वर्षे चालू आहे. त्या मध्ये स्त्रियांचा आरक्षणाचा मूळ मुद्दा बाजूला पडला आहे. पुरूषांच्या जागा घटतील हा मुद्दा काळजीचा ठरत आहे. त्या करता जागांची संख्या वाढवण्याच्या मुद्दा जोर पकडत आहे. त्या मुळे सरकारी खर्च वाढेल याचे कोणालाच सोईरसुतक नाही. देश खड्‌ड्यात गेला तरी चालेल परंतु माझी खुर्ची शाबूत राहिली पाहिजे असा अघोरी विचार स्पषटपणे पुढे येत आहे. खरोखरच हा प्रश्न गहन आहे काय? त्या वर कांहीच उपाय नाही काय? कोठलाही प्रश्न उपाय नसण्या इतका गहन असूच शकत नाही. त्या करता सध्याच्या सभासदानी त्याग केला पाहिजे. औदार्य दाखववावयास पाहिजे.

१९८४ साली प्रशासन खर्च कमी करण्या करता शासनाने शासकीय सेवेतील कर्मचारी संख्या कमी करावयाचे ठरवले. ती कमी करण्या करता कर्मचाऱ्याना प्रलोभने दाखवली, निरनिराळ्या कारणाने रिकाम्या झालेल्या जागा भरण्यावर निर्बंध आणले, जवळ जवळ नवीन नेमणुका बंद केल्या. हे केले त्या बद्दल आक्षेप नाही. परंतु, हाच विचार संसदेतील जागा बद्दल केला नाही. यातुन राजकारणी व्यक्ती किती स्वार्थी आहेत हे दिसुन येते. अशा व्यक्तीना जागा दाखवण्याची वेळ आली आहे. महिलानी जागा वाढवण्याला पूर्णपणे विरोध दाखवावा. इतकेच काय जागा कमी करावयास लावाव्यात. एक तालुका एक आमदार व एक जिल्हा एक खासदार हे तत्त्व वापरावयास भाग पाडावे. तसेच राज्यसभेच्या जागा लोकसभेच्या निम्म्या व विधान परिषदेच्या जागा विधानसभेच्या निम्म्या असा दंडक घालून द्यावा.

जर पुरूष सभासदाना स्त्रियांच्या आरक्षणा पेक्षा आपली खुर्ची जास्त प्रिय असेल तर स्त्रियानी काय करावे या बाबत एक पत्र मिळाले आहे. ते याच साईटवर ठेवले आहे. (http://geocities.com/janahitwadi/readerssay.htm#head1) या पत्रानुसार सर्व स्त्री सभासदानी आपले सध्याचे पक्ष सोडून नवीन महिला पक्ष स्थापन करावा. आजकाल १०-१५ सभासद असले तरी अशा पक्षाची चलती असते. जो पक्ष हे विधेयक मंजूर करावयास तयार होईल त्याला पाठिंबा केवळ या एकाच मुद्यावर द्यावा. विधेयक मंजूर झाल्यावर परत आपल्या पक्षात ज्याना जायचे असेल त्यानी जावे. माझ्या मते ही वेळ पुरूष सभासदानी येऊ देऊ नये.

दुसरा मुद्दा जर ३३ टक्के जागा सध्या असलेल्या संख्येतून द्यावयाच्या आहेत तर त्या फक्त अनआरक्षित संख्येतून का द्याव्यात? हे ही बरोबर आहे. जनजाती, जमाती वगैरे करता आरक्षित असलेल्या जागा मध्येही त्या त्या गटातील स्त्रिया करता आरक्षण ठेवावे. थोडक्यात सध्याच्या आरक्षित जागा मध्येही ३३ टक्के जागा आरक्षित करणे हा न्याय होईल. थोडक्यात सध्या अस्तित्त्वात असलेली आरक्षणे ३३ टक्के स्त्रियांच्या विचाराधीन असलेल्या जागातही ठेवावीत. असा प्रश्न सोडवला तर कोणालाही तक्रार करता येणार नाही.